सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

## उच्च व तंत्र शिक्षण विभाग

## शिल्प कारागीर प्रशिक्षण योजनेतंर्गत
## खाजगी कायम विना अनुदान तत्वावर खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु करण्यांसाठी

## मार्गदर्शक सूचना
## २०१५-१६

**व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,**
महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्रमांक १००३६, मुंबई ४०० ००१.

## अनुक्रमणिका


| अ.क्र | विषय | पान क्रमांक |
|---|---|---|
| १ | योजनेची पार्श्वभूमि, उद्देश व सद्य:स्थिती | ३ |
| २ | कायम विना अनुदान तत्वावर खाजगी खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु<br>करण्याकरीता उच्चस्तरीय निवड समितीचे गठन | ३ |
| ३ | कायम विना अनुदान तत्वावर खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु करणे/विदयमान संस्थेमध्ये नविन व्यवसाय/तुकडी सुरु करण्यास इच्छुक अर्जदारांसाठी सूचना | ४ |
| ४ | खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना परवानगी देण्यांबाबतच्या प्रक्रियेचा कालावधी. | ५ |
| ५ | ऑन लाईन अर्ज, नोंदणी तथा प्रक्रिया शुल्क. | ५ |
| ६ | प्राप्त झालेल्या अर्जावर करण्यांत येणारी पुढील कार्यवाही | ६ |
| ७ | Norms for Engineering and Non- Engineering trades under Craftsmen Training Scheme | ७ ते ११ |
| ८ | Space Requirement for ITI / ITCs | ११ |
| ९ | व्यवसाय औ.प्र.केंद्रासाठी शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचारीवृंद यांचा आकृती बंध तक्ता | १२ |
| १० | डि.जी.ई.टी.,नवी दिल्ली यांचे आदेश पत्र तथा शासन निर्णय. | १३ |
| ११ | मुळ कागदपत्रे पडताळणी दिनांकास संचालनालयास प्रत्यक्ष सादर करावयाचे मुळ कागदपत्रे. | १४ |
| १२ | Formats to be submitted along with Application Form | १५ |
| १३ | Annexure - १ Submittal Form | १६ |
| १४ | Annexure - २, Format-“A” | १७ |
| | Annexure - ३, Format- “B” | १८ |
| १५ | Annexure – ४ व्यवस्थापनाने भरुन द्यावयाचे प्रतिज्ञापत्र | १९ ते २१ |
| १६ | Annexure – ५ हमी पत्र नमुना | २२ |

# (१) योजनेची पार्श्वभूमी, उद्देश व सद्य: स्थिती

## १.१ पार्श्वभूमी

शिल्प कारागीर प्रशिक्षण योजना ही भारत सरकारने १९५० मध्ये सुरु केलेली असून, या योजनेखाली सर्व देशभर प्रशिक्षणाचा दर्जा समान राखण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद, १९५६ मध्ये स्थापन केलेली आहे. या परिषदेमार्फत औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे / खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांबाबतचे धोरण त्यांचे नियंत्रण, विविध व्यवसाय अभ्यासक्रम तयार करणे, बांधकाम, विद्युत पुरवठा, यंत्रसामुग्रीची मानके, निदेशकांचे प्रशिक्षण, राष्ट्रीय स्तरावर चाचणी घेणे, राष्ट्रीय व्यवसाय प्रमाणपत्र देणे इत्यादी बाबी नियंत्रीत केल्या जातात. या परिषदेचे प्रमुख श्रम मंत्री भारत सरकार हे असून केंद्र व राज्य शासनाचे प्रतिनिधी, मालक व नोकर संघटनेचा प्रतिनिधी व विविध विषयातील तज्ञ सभासद या समितीत असतात. या योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरुवातीला केंद्र शासनाकडून केली जात होती. मात्र १९६९ सालापासून या योजनेची अंमलबजावणी राज्य सरकारकडून केली जात आहे. तसेच शासनाच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था वरील खर्च ही राज्य शासनाकडूनच केला जात आहे.

## १.२ योजनेचे मुख्य उद्देश:-

१) कारखान्यांना विविध कामासाठी लागणा-या कुशल मनुष्यबळाचा पुरवठा करणे.
२) युवकांना रोजगाराभिमुख प्रशिक्षण देऊन कारखान्यात रोजगार मिळविण्यासाठी सक्षम बनविणे.
३) युवकांना कौशल्ये युक्त प्रशिक्षण देऊन उत्पादन व इतर सेवा क्षेत्रामध्ये स्वयंरोजगार सुरु करण्यासाठी सक्षम बनविणे.
४) कामगारांना योजनाबध्द प्रशिक्षण देऊन औद्योगिक आस्थापनाचा दर्जा, गुणवत्ता व उत्पादन वाढविणे.

## १.३ योजनेची सद्य: स्थिती

राज्यात सध्या **४१६** शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु असून एकूण प्रवेश क्षमता **११३७६६** एवढी आहे. तसेच राज्यात कार्यरत असणाऱ्या खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची संख्या **३६४** असून त्याची प्रवेश क्षमता **४२७४०** एवढी आहे. व अजूनही नवीन खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु करण्याची किंवा चालू असलेल्या खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांतून नवीन व्यवसाय सुरु करण्यासाठी किंवा संस्थेत चालू असलेल्या तुकडीच्या संख्येत वाढ करण्यासाठी अनेक संस्थाकडून मागणी होत आहे.

# (२) कायम विना अनुदान तत्वावर खाजगी खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु करण्याकरीता उच्चस्तरीय निवड समितीचे गठन

नवीन खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना परवानगी देण्यासाठी शासनाने शासन निर्णय क्रमांक आयटीआय-१०९९/(८८)/व्यशि-१, दि. १९ मे, २००० अन्वये निश्चित धोरण ठरविलेले असून परवानगी देण्यांसाठी उच्चस्तरीय निवड समिती गठीत केलेली आहे. या निवड समितीच्या शिफारशीवरच शासन नवीन खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु करण्यांस किंवा चालु असलेल्या संस्थेतून नवीन व्यवसाय सुरु करण्यांस परवानगी देते.

१.. **अर्जदाराची पात्रता:-**

I. खाजगी / शासनाचे उपक्रम / मालकीचे उपक्रम,कंपनी ऍ़क्टखाली नोंदणीकृत संस्था.

II. स्पेशल एकॉनॉमी झोनचे प्रमोटर्स (SEZ)

III. नोंदणी कायद्यातंर्गत नोदणीकृत सोसायटी / ट्रस्ट इत्यादी.

**२. अर्जासोबत सादर करावयाच्या मुळ कागदपत्रांबाबत सूचना :-**

**२.१** जागा संस्थेच्या मालकीची असल्यास मालकी हक्का बाबतचे पुरावे (६ महिन्याच्या आतील खाते उतारा, ७/१२ उतारा/ मालमत्ता ¤स्तऐव•ा/Property Card इ.) सादर करणे आवश्यक आहे.

**२.२** जागा भाडयाची असल्यास दुय्यम निबंधकाकडे विहीत पध्दतीचे नोंदणीकृत व किमान तीन वर्षासाठीचे भाडे करारपत्राची प्रत सादर करणे आवश्यक आहे.

**२.३** दिनांक १५/४/२००२ च्या शासन निर्णयानुसार व्यवसाय / तुकडी निहाय नोंदणी शुल्क शासनास जमा केल्याची माहिती / पुरावे (चलनाची प्रत) सादर करणे आवश्यक आहे.

**२.४** १००/- रुपयांच्या स्टॅम्प पेपरवरील व्यवस्थापनाचे हमीपत्र सादर करणे आवश्यक आहे. (Annexure -५)

**२.५** संस्था आर्थिकदृष्टया सक्षम असल्याबातचे कागदोपत्री पुरावे (जसे बँक स्टेटमेंट (राष्ट्रीयकृत बँक), मागील ३ वर्षाचा ऑडीट रिपोर्ट, ताळेबंद पत्रक, इत्यादी) जोडणे आवश्यक राहील. पतपेढीच्या ठेवी गृहीत धरल्या जाणार नाहीत.

**२.६** डीजीईटी, नवी दिल्ली यांच्या नवीन नियमानुसार नविन व्यवसायाची मागणी करतांना संलग्नतेकरीता एकूण २ तुकडयांची मागणी करणे आवश्यक राहील.

**२.७** डीजीईटी, नवी दिल्ली याच्या मानकाप्रमाणे संस्थेकडे जागा, इमारत, यंत्रसामुग्री, टुलकिट, विद्युत पुरवठा,कर्मचारी इत्यादी असल्यास त्याची माहिती अथवा यासाठी मानकानुसार लागणारा पुरासा बँक बॅलन्स संस्थेकडे असणे आवश्यक राहील. (डीजीईटी, नवी दिल्ली ची मानके डीजीईटी च्या www.dget.nic.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.)

वरीलप्रमाणे सर्व सूचनांचे अनुपालन होण आवश्यक राहील.

## (३) खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना परवानगी देण्यांबाबतच्या प्रक्रियेचा कालावधी.

कायम विनाअनुदान तत्त्वावर नवीन औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु करणे किंवा विद्यमान खाजगी संस्थेतील नवीन व्यवसाय / तुकडी वाढ करण्यांकरिता शासनाचे इरादा पत्र (Letter of Intent) प्राप्त करण्याची प्रक्रिया वर्षभर ऑन लाईन पध्दतीने खालील प्रमाणे सुरु राहील.

| अ.क्र | **तिमाही कालावधी** | **संचालनालयाकडून शासनास सादर करावयाचा दिनांक** |
|---|---|---|
| १ | **जानेवारी ते मार्च अखेर प्राप्त अर्ज** | एप्रिल अखेर. |
| २ | **एप्रिल ते जुन अखेर प्राप्त अर्ज** | जुलैच्या अखेर. |
| ३ | **जुलै ते सप्टेंबर अखेर प्राप्त अर्ज** | ऑक्टोबरच्या अखेर. |
| ४ | **ऑक्टोबर ते डिसेंबर अखेर प्राप्त अर्ज** | जानेवारीच्या अखेर. |

## (४) ऑन लाईन अर्ज, नोंदणी तथा प्रक्रिया शुल्क.

### ४.१ ऑन लाईन अर्ज

ऑन लाईन अर्जाचा नमुना व मार्गदर्शक सूचना संचालनालयाच्या www.dvet.gov.in वेब साईटवर उपलब्ध आहे.

### ४.२ नोंदणी शुल्क व प्रक्रिया शुल्क (Processing Fee)

कायम विना अनुदान तत्वावर खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु करणे/विद्यमान संस्थेमध्ये नविन व्यवसाय/तुकडी सुरु करण्याकरिता आवश्यक छाननी प्रक्रियेसाठी रु. ५००/- प्रक्रिया शुल्क शासनास जमा करण्यांत यावेत. तसेच नवीन कायम विना अनुदान तत्त्वावर खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु करण्यांकरिता केलेल्या अर्जासाठी प्रत्येक व्यवसायाच्या प्रती तुकडीकरिता रु.६,०००/- एवढे नोंदणी शुल्क आकारलेले आहेत. सदरचे नोंदणी शुल्क व प्रक्रिया शुल्क शासनाच्या खालील लेखाशिर्षाखाली जमा करुन चलनाची मुळ प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

**"०२३०-कामगार व सेवायोजन,**
**(०१) (०१) इतर जमा**
**(८००) इतर जमा**
**(०२३० ०१०७) "**

### ४.३ अधिस्विकृती शुल्क

सध्या संस्थेतील व्यवसाय / तुकडयांना संलग्नता मिळविण्यासाठी करावयाच्या निरिक्षणासाठी कोणतेही शुल्क आकारले जात नव्हते.तथापी ४० व्या एनसीव्हीटी बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयानुसार औदयोगिक प्रशिक्षण संस्थेमधील व्यवसाय/तुकडयांना संलग्नता मिळविण्यासाठी क्वालिटी कौंसिल ऑफ इंडिया (QCI) या संस्थेमार्फत अधिस्विकृती (accreditation) मिळविणे आवश्यक रहाणार आहे.सदरची अधिस्विकृती मिळविण्यासाठी QCI या संस्थेला शुल्क अदा करण्याचे निश्चित केलेले आहे.डीजीईटी, नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक डीजीईटी-१९(२२)/२०१२-सीडी दिनांक-६ ऑगस्ट,२०१२ अन्वये QCI मार्फत करावयाच्या अधिकारीक मान्यतेच्या प्रक्रियेबाबत सविस्तरपणे नमूद केलेले आहे अधिक माहितीसाठी www.qcin.org.in ही वेबसाईट पहावी.

### ४.४ अनामत रक्कम

सध्या खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था चालविणाऱ्या व्यवस्थापनाकडून कोणत्याही नियमांचा भंग होवु नये व त्यामुळे प्रशिक्षणार्थ्यांचे तसेच संस्थेतील कर्मचाऱ्यांचे नुकसान होवु नये, याकरिता व्यवस्थापनाकडुन नवीन संस्थेसाठी रु १.०० लाख एवढी अनामत रक्कम घेतली जात असून विद्यमान संस्थेतील नविन व्यवसाय / जादा तुकडी करिता प्रति व्यवसाय प्रति तुकडीसाठी रु १०,०००/- एवढी अनामत रक्कम घेतली जाते त्यावर कोणतेही व्याज दिले जात नाही. संस्थेने ऑन लाईन अर्ज करतांनाच अनामत रक्कम धनाकर्षाच्या स्वरुपात जमा करावयाची आहे. (दि.२२ ऑगस्ट-२०१३ रोजीचा शासन निर्णय) उपरोक्त रक्कम संस्थेने **संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई १ (Director, Directorate of Vocational Education & Training, Mumbai १)** यांचे नावे धनाकर्षाद्वारे शासनास जमा करणे आवश्यक आहे.

## (५) प्राप्त झालेल्या अर्जावर करण्यांत येणारी पुढील कार्यवाही

५.१ संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांचे स्तरावर प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करण्यांत येवून त्यांचे एकत्रित विवरणपत्र तयार करुन संस्थानिहाय प्रस्ताव आवश्यक त्या अभिप्रायासह मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालय, मुंबई यांचेकडे मंजूरीकरिता प्रत्येक तीन महिन्यांनी सादर करतील. मुळ कागदपत्रे (सोबत कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रतींचा एक संच) यांची तपासणी ही संचालनालयाच्या स्तरावरील तपासणी कार्यक्रमांमध्ये त्रैमासिक अर्ज प्राप्त झाल्यानंतर दर १५ दिवसांनी केली जाईल त्याबाबत संस्थेच्या प्रतिनिधींना ई-मेल व्दारे सूचीत करण्यांत येईल. सदर तपासणीसाठी संस्थेचे प्रतिनिधी मुळ कागदपत्रे (सोबत कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रतींचा एक संच) घेऊन प्रत्यक्षात उपस्थित राहतील.

५.२ प्राप्त सर्व अर्जांची शासनाने गठित केलेल्या समितीमार्फत छाननी करण्यांत येऊन ही समिती खाजगी औ.प्र.संस्थांना प्रथम तत्वत: मंजूरी / नामंजूरी देण्यांची शिफारस शासनास करेल व शिफारशीच्या आधारावर राज्य शासनाकडून नवीन संस्थांना इरादा पत्र देण्यांचे आदेश काढण्यात येतील.

५.३ राज्य शासनाची मान्यता मिळाल्यानंतर संबंधित संस्था क्वालिटी  कौंसिल ऑफ इंडिया (QCI) या संस्थेमार्फत देण्यात येणा-या अधिस्विकृतीच्या (accreditation)अ-ुषं[illegible]-ो QCI कडे ऑन लाईन अर्ज सादर करेल.एनसीव्हीटी,नवी दिल्ली  यांची संलग्नता प्राप्त करण्यासाठी QCI या संस्थेची अधिस्विकृती मिळविणे ही पूर्व आवश्यकता राहील.

५.४ राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषदेच्या उपसमितीची बैठक होवून QCI न दिलेल्य अधिस्विकृतीच्या आधारे संलग्नतेबाबत निर्णय संस्थांना कळविण्यांत येईल.  (संलग्नतेबाबतचा निर्णय डि.जी.ई.टी., नवी दिल्ली यांच्या वेबसाईट www.dget.nic.in वर उपलब्ध राहील.)

५.५ संलग्नता प्राप्त झाल्यानंतर प्रत्यक्षात प्रवेश करण्यांस परवानगी देण्यांत येईल.

५.६ शासन व संचालनालयाने वेळोवेळी केलेली निरीक्षण, प्रशिक्षण व परीक्षा इत्यादीबाबत केलेल्या सूचना संस्थेने पाळणे बंधनकारक आहे.

## 6) Norms for Engineering and Non- Engineering trades under Craftsmen Training Scheme

**ABOVE NORMS ARE ATTACHED HEREWITH**

## 7. Space Requirement for ITI / ITCs

| Capacity of ITI in each shift | Without hostels & staff quarters | Additional space for hostels & staff quarters |
|---|---|---|
| It is having 200 or less trainees | To be decided by management of Institute. | - |
| It is having 201 – 500 trainees | 1.5 acre in Metro / urban / semi urban & 2 acre in rural. | 0.5 acre in Metro / urban / semi urban & 1 acre in rural. |
| It is having  501-1000 trainees | 2 acre in Metro / urban / semi urban & 2.5 acre in rural. | 1.5 acre for all locations. |
| It is having 1001 or more trainees | 3 acre in Metro / urban / semi urban & 5 acre in rural. | As per need to comply with the local permissible building bye – laws. |

## Space Norms for Main Building

| Sr.No. | Description | Area in Sq. Meter |
|---|---|---|
| 1 | Principal's Room | 15 – 20 |
| 2 | Vice Principal's Room | 12 –15 |
| 3 | Stationery Store Room | 10 |
| 4 | Clerk Room | 4/ clerk including storage space |
| 5 | Record Room | 10 |
| 6 | Library & Reading Room | 30 up to 250 seats them 10 per additional 250 seats |
| 7 | Class Room | 1 per Trainee; 6 class rooms for 250 seats. |
| 8 | Drawing Hall | Included in Sr. No. 7 |
| 9 | Lockers | 2.5 for every 100 seats |
| 10 | Assembly Hall | 500 for 500 to 1000 seats<br>( Including Dias ) * Optional |
| 11 | Tool Room<br>( Precision Measuring Lab ) | 20 |

## (८) व्यवसाय औ.प्र.केंद्रासाठी शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचारीवृंद यांचा आकृती बंध तक्ता

| अ.क्र | पदनाम | वेतनश्रेणी | पदांची संख्या |
|---|---|---|---|
| 1 | प्राचार्य | रु 9300-34800 (G.P. 4600) | 1 |
| 2 | गट निदेशक | रु 9300-34800 (G.P. 4200) | 1 |
| 3 | शिल्प निदेशक | रु 9300-34800 (G.P. 4200) | ( प्रत्येक व्यवसायासाठी एक ) |
| 4 | गणित / चित्रकला निदेशक | रु 9300-34800 (G.P. 4200) | 1 |
| 5 | भांडारपाल | रु 5200-20200 (G.P. 2800) | 1 |
| 6 | वरिष्ठ लिपिक | रु 5200-20200 (G.P. 2400) | 1 |
| 7 | कनिष्ठ लिपिक | रु 5200-20200 (G.P. 1900) | 1 |
| 8 | शिपाई | रु 4400-7440 (G.P. 1300) | 2 |
| 9 | सफाईगार | रु 4400-7440 (G.P. 1300) | 1 |
| 10 | चौकीदार | रु 4400-7440 (G.P. 1300) | 1 |

**टिप - प्रत्येक वाढीव तुकडीसाठी 1 जादा शिल्प निदेशक**

**औ.प्र.संस्थानासाठी शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचारीवृंद यांची डी.जी.ई.टी., नवी दिल्ली यांच्या मानकाप्रमाणे शैक्षणिक अर्हता**

| अ.क्र | पदनाम | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १ | प्राचार्य | अभियांत्रीकी / तंत्र शास्त्रातील पदवी अथवा अभियांत्रीकी / तंत्र शास्त्रातील पदविका |
| २ | गट निदेशक | अभियांत्रीकी / तंत्र शास्त्रातील पदवी / पदविका अथवा NTC + CTI |
| ३ | शिल्प निदेशक | अभियांत्रीकी / तंत्र शास्त्रातील पदविका / NTC + CTI |
| ४ | गणित / चित्रकला निदेशक | अभियांत्रीकी / तंत्र शास्त्रातील पदविका |
| ५ | भांडारपाल | विधी / कला / विज्ञान/ वाणीज्य शाखेतील पदवी |
| ६ | वरिष्ठ लिपिक | विधी / कला / विज्ञान/ वाणीज्य शाखेतील पदवी |
| ७ | कनिष्ठ लिपिक | विधी / कला / विज्ञान/ वाणीज्य शाखेतील पदवी |
| ८ | शिपाई | ४ थी पास |
| ९ | सफाईगार | ४ थी पास |
| १० | चौकीदार | ४ थी पास |

# (९) डि.जी.ई.टी.,नवी दिल्ली यांचे आदेश पत्र तथा शासन निर्णय.

(अ) कायम विनाअनुदान तत्त्वावर खाजगी औ.प्र.संस्थांना परवानगी देण्यांकरिता ऑन लाईन पध्दतीने अर्ज मागविण्यांची कार्यपध्दती सुरु करण्यांस परवागनी देण्यांबाबत. शासन निर्णय - क्र. आयटीआय-२२१३/प्र.क्र.१४६/व्यशि-३, दि.२२ ऑगस्ट,२०१३.

(ब) नोंदणी शुल्क व अनामत रकमेबाबतचा शासन निर्णय-क्र.पीटीआय-१०००/(२४६)/व्यशि-१, दि. १५/०४/२००२.

(क) खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांतील प्रशिक्षणार्थ्यांना आकारावयाचे शुल्क शासन निर्णय - क्र.आयटीआय-२००८/रिट/(२७/०८)/व्यशि-२, दि. ३१ मार्च,२००८.

(ड) संस्थेला परवानगी दिल्यानंतर तीन वर्षाच्या आत संस्था सुरु करणेबाबत शासन पत्र - क्र.पीटीआय-१०९१/(१०३०)/व्यशि-४, दि. २३ ऑक्टोबर,१९९१.

(इ) शासनाची परवानगी न घेता विद्यार्थ्यांना नियमबाहय प्रवेश देणाऱ्या संस्थांवर दंडात्मक कार्यवाही करण्यांबाबत शासन पत्र - क्र.एनजीसी-२००५/(८२१/०५)/मशि-३, दि.२२ जानेवारी,२००७.

(ई) QCI मार्फत अधिस्विकृती मिळविण्यांचे -
डी.जी.ई.टी.,नवी दिल्ली यांचे पत्र क्र. DGET-१९(२२)/२०१२-CD, dt. ०६/०८/२०१२.

(प) डि.जी.ई.टी.,नवी दिल्ली यांचे सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये विहित नमुन्यात वेब साईट तयार करणेबाबत.
डी.जी.ई.टी.,नवी दिल्ली यांचे पत्र क्र. DGET-१९(१४)/२०१२-CD, dt. १०/०५/२०१०.

(फ) डि.जी.ई.टी.,नवी दिल्ली यांचे अखिल भारतीय व्यवसाय परीक्षा सेमिस्टर सिस्टिमप्रमाणे घेण्यांबाबत.
डी.जी.ई.टी.,नवी दिल्ली यांचे पत्र क्र. DGET-१९(४)/२०११-CD-Pt dt. १४/०३/२०१३.

## १०. मुळ कागदपत्रे पडताळणी दिनांकास संचालनालयास प्रत्यक्ष सादर करावयाचे मुळ कागदपत्रे.

१) संस्थेचा ऑन लाईन अर्ज व रु. ५००/- भरल्याचा पुरावा.

२) संस्थेने शासनास जमा केलेल्या नोंदणी शुल्काचे चलन.

३) संस्था नोंदणी प्रमाणपत्र.

४) अध्यक्षांचे / सचिवांचे १०० रुपयांचे स्टॅम्पपेपरवरील हमीपत्र.

५) संस्थेचे जागेबाबातचे कागदपत्रे.(बांधकाम तयार असल्यास बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र)

६) संस्थेचे बॅक बॅलन्स प्रमाणपत्र. (ऑन लाईन अर्ज सादर करण्यांच्या दिवसाचे)

७) विद्यमान संस्थांबाबत संस्थेच्या मूळ परवानगीचे शासन आदेश व संलग्नतेचे सर्व आदेश.

## Formats to be submitted along with Application Form

## Annexure - 1
## Submittal Form

Date:

From :-

**The Secretary of the Trust / Principal,**
**----------------------------------------------**
**----------------------------------------------**
**----------------------------------------------**

To,

The Director (Training)
Directorate of Vocational Education,
Maharashtra State, 3, Mahapalika Marg, Mumbai 400 001.

**Subject:-** **Proposal for introduction of new Pvt. Industrial Training Institute academic 2013–2014 & Additional trades and units in existing Pvt. ITIs**

Sir,

We are submitting application form (Original + 1 Copy) for starting of New Pvt. ITI for following courses / additional trades and units in existing Pvt. ITIs

| Sr. No. | Name of Trade | Unit | Intake | Sr. No. | Name of Trade | Unit | Intake |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | 2 | | | |
| 3 | | | | 4 | | | |
| 5 | | | | 6 | | | |
| 7 | | | | 8 | | | |
| 9 | | | | 10 | | | |

We certify that the institution has submitted the application form for above and that the information provided in the application form are true to the best of my knowledge and belief.

Authorized Signatory

Name: ________________________________________

Designation: ____________________________________

Place:
Date:

**Annexure - 2**

**FORMAT 'A'**

| | | |
|---|---|---|
| 1 | Proposed Institute / Name of Institute wish to start additional trades. | : |
| 2 | Details Address/ Place | : |
| 3 | Institute place is rental or own | |
| 4 | If rental, name of owner , address & agreement with owner as per Format 'B' | : |
| 5 | Area of the Building , rooms available,<br>( details Map showing all the details of the building , training areas should be attached.) | : |
| 6 | Weather all the facilities are available in the institute | |
| a) | Toilets | |
| b) | Drinking Water | |
| c) | Ventilation /( Natural /Artificial) | |
| d) | Air circulation ( Natural /Artificial) | |
| e) | Layout of building ( Layout should be good and feasible for training ) | |
| f) | Map of building should be signed by architect or authorised person | |

**Annexure - 3**

**FORMAT 'B'**

**Owners Agreement Letter**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | Name of Owner | : | |
| 2 | Owners permanent Address<br>( Taluka, Dist, Road,Pincode etc ) | : | |
| 3 | Description of place<br>East:-<br>West:-<br>South:-<br>North :- | : | |
| 4 | Which floor of building given for the institute on rental basis | : | |

I Shri ----------------------------------agrees to allow above place to run government approved courses by this agreement for full time duration and for the period of ------------------

( Name of Owner and Signature )

| | | | |
|---|---|---|---|
| 5 | Name of Witness , address and signature<br>1.<br>2. | : | <br><br>Signature<br>Signature |

Date:-

Place:-

| | | | |
|---|---|---|---|
| 6 | If institute is old | | |
| (a) | Area Available for the already existing trades and No. of Classroom | : | |
| (b) | Proposed area & class room for the proposed trades<br>( Should be marked in the Map ) | | |
| 7. | Whether proposed institute / place is used for the other courses by the institute? | : | |

Place:-

Date

Signature of Applicant
Name / Designation /Name of trust and address with seal

## Annexure - 4

## व्यवस्थाप[illegible] भरुन द्यावयाचे प्रतिज्ञापत्र

नवीन खाजगी खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु करण्यासाठी नोंदणीकृत सोसायटी व्यवस्थापनाच्या प्रमुखांकडून उपलब्ध सुविधांबाबत घ्यावयाचे प्रतिज्ञापत्रांचा नमुना.

| अ.क्र. | नांव | तपशिल |
|---|---|---|
| १. | प्रस्तावित व्यवसाय (किमान गट) | १.<br>२.<br>३.<br>४.<br>५.<br>६.<br>७.<br>८. |

२अ. वर नमूद केलेल्या व्यवसायांकरिता मानकांप्रमाणे आवश्यक असणाऱ्या बांधकाम केलेल्या इमारतीचे चटईक्षेत्र (ऑफीस,स्टोअर,वर्कशॉप इत्यादी)

ब. संस्थेने प्रत्यक्ष बांधकाम केलेल्या जागेचे चटईक्षेत्र (ऑफीस,स्टोअर,वर्कशॉप इत्यादी) स्वतंत्रपणे दर्शविण्यांत यावे.

क. बांधकाम तयार असल्याचे प्रमाणपत्र जोडलेले आहे किंवा नाही.

३ अ. मानकांप्रमाणे वरील आठ व्यवसायांकरिता आवश्यक असणारी जागा

| अ. क्र. | संस्थेने मागणी केलेले व्यवसाय | डी.जी.ई.टी.,नवी दिल्ली यांच्या मानकानुसार आवश्यक जागा | प्रत्यक्षात संस्थेकडे उपलब्ध असलेली जागा |
|---|---|---|---|
| | | | |

ब. संस्थेकडे उपलब्ध जागा

क. जमिनीच्या मालकीचे प्रमाणपत्र जोडले आहे किंवा नाही.

**४. बँक बॅलन्स :-**

अ. संस्थेकडे बांधकाम केलेली इमारत तयार असल्यास मागितलेल्या आठ व्यवसायकरिता आवश्यक असलेली यंत्रसामुग्री व टूल्सकरिता किमान आवश्यक असलेली रक्कम.

ब. संस्थेच्या नांवे प्रत्यक्षात असलेला बँक बॅलन्स.

| अ.क्र. | बँकेचे नांव | खाते क्रमांक | शिल्लक रक्कम |
|---|---|---|---|
| | | | |

क. ब मध्ये नमूद केलेली रक्कम मागील तीन महिन्याच्या कालावधीत जमा असल्याबाबतचे बँकेचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

ड. संस्थेकडे मुदत ठेव स्वरुपात रक्कम आहे काय? होय/नाही असल्यास खालीलप्रमाणे माहिती द्यावी.

| अ. क्र. | बँकेचे नांव | मुदत ठेवीचा क्रमांक | रक्कम | मुदत ठेवीची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| | | | | |

५. अ) थ्री फेज पॉवर सप्लाय उपलब्ध झाल्याचा दिनांक
ब) थ्री फेज पॉवर सप्लाय विद्युत यंत्रणेद्वारे मिळालेला ग्राहक क्रमांक :

क) थ्री फेज पॉवर सप्लाय मीटर क्र.

६. अ) पिण्याच्या पाण्याची सोय कशी आहे ?
१) विहिरीद्वारे २) बोअरवेलद्वारे ३) पाणीपुरवठा यंत्रणेद्वारे

ब) पाणीपुरवठा यंत्रणेद्वारे असल्यास मीटर क्रंमांक :

क) पाणीपुरवठा यंत्रणेद्वारे मिळालेला ग्राहक क्रमांक :

७. संस्थेला माध्यमिक शाळा / महाविद्यालय
इत्यादी शैक्षणिक संस्था चालविण्यांचा
अनुभव आहे किंवा नाही?

८. संस्था नोंदणीकृत आहे किंवा कसे ?
असल्यास रजिस्ट्रेशन क्रमांक

मी प्रतिज्ञापूर्वक असे नमूद करतो की, वर दिलेली माहिती ही माझ्या माहितीप्रमाणे बरोबर व खरी आहे. निरिक्षणाच्या वेळी त्यामध्ये कोणतीही विसंगती आढळून आल्यास व त्यामुळे माझा अर्ज नाकारण्यांत आल्यास माझ्याकडून कोणताही आक्षेप घेतला जाणार नाही व दिलेला निर्णय माझ्यावर बंधनकारक राहील.

अध्यक्षांची सही, नांव व पत्ता

साक्षीदारांची सही /-

१. नांव व पत्ता:-

१. नांव व पत्ता :-

## Annexure – ५

## हमी पत्र नमुना

मी ------------------------------------ अध्यक्ष/सचिव -------------------------- संस्था (सोसायटी/कंपनी) ---------------------------------------- या नावे खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था------------------------ येथे सुरु करण्यांचे प्रस्तावीत करीत आहे. मी खालील बाबींची पूर्तता करण्यांची हमी या हमीपत्राव्दारे घेत आहे.

सुरु करण्यांत येणारी खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था ही कायम विना अनुदान तत्त्वावरच सुरु करण्यांत येईल.

या संस्थेत नेमणुक करण्यांत येणाऱ्या शिक्षकीय पदांना शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील शिक्षकीय पदांच्या वेतनाच्या २/३ एवढे वेतन देण्यांत येईल व संबंधित शिक्षकांच्या नांवे बँक खाते उघडून धनादेश / धनाकर्षाव्दारे वेतन अदा करण्यांत येईल.

शासनाची परवानगी, QCI ची अधिस्विकृती व संलग्नता प्राप्त झालेनंतरच व्यवसाय/तुकडीत प्रवेश करण्यांत येईल.तद्नंतरच प्रशिक्षणार्थ्यांकडून प्रवेश शुल्क हे शासनाच्या नियमानुसार आकारण्यांत येईल.

प्रवेश हे शासनाच्या आरक्षण धोरणानुसारच करण्यांत येतील.

खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत नविन विषयांकरिता ईमारत, अद्यावत ग्रंथालय, प्रशिक्षीत शिक्षक, यंत्र सामुग्री, कार्यशाळा, पाणी, विज व विद्यार्थ्यांना आवश्यक या सर्व सोईसुविधा उपलब्ध करुन देण्यांत येईल.

दिनांक :-  /  / २०
ठिकाण :-

(                    )

अध्यक्ष / सचिव

साक्षीदार :- १)

२)